PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Ha Khel Savlyancha
Year: 1976

Song: Ratris Khel Chale
Lyricist: Sudhir Moghe

रात्रीस खेळ चाले या गूढ चांदण्यांचा
रात्रीस खेळ चाले या गूढ चांदण्यांचा
संपेल ना कधी ही हा खेळ सावल्यांचा
हा खेळ सावल्यांचा
हा खेळ सावल्यांचा
रात्रीस खेळ चाले या गूढ चांदण्यांचा
संपेल ना कधी ही हा खेळ सावल्यांचा
हा खेळ सावल्यांचा

हा चंद्र ना स्वयंभू रवी तेज वाहतो हा
ग्रहणात सावल्यांचा अभिशाप भोगतो हा
हा चंद्र ना स्वयंभू रवी तेज वाहतो हा
ग्रहणात सावल्यांचा अभिशाप भोगतो हा
प्रीतीस होय साक्षी हा दूत चांदण्यांचा
हा खेळ सावल्यांचा
हा खेळ सावल्यांचा
रात्रीस खेळ चाले या गूढ चांदण्यांचा
संपेल ना कधी ही हा खेळ सावल्यांचा
हा खेळ सावल्यांचा

आभास सावली हा असतो खरा प्रकाश
आभास सावली हा असतो खरा प्रकाश
जे सत्य भासती ते असती नितांत भास
हसतात सावलीला हा दोष आंधळ्याचा
संपेल ना कधीही हा खेळ सावल्यांचा
हा खेळ सावल्यांचा

या साजीऱ्या क्षणाला का आसवे दिठीत
मिटतील सर्व शंका
मिटतील सर्व शंका ऊबदार या मिठीत
गवसेल सूर अपुल्या या धुंद जीवनाचा
हा खेळ सावल्यांचा
हा खेळ सावल्यांचा
रात्रीस खेळ चाले या गूढ चांदण्यांचा
संपेल ना कधी ही हा खेळ सावल्यांचा
हा खेळ सावल्यांचा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*